कर्मचारीवर्ग खाते

परिपत्रक क्रमांक – २१ /१९९४.

क्र. राप/आस्था/मागा-२/ ५५९४.
म. रा. मा. प. महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन, डॉ. आनंदराव नायर मार्ग,
मुंबई-४०० ००८. दिनांक : २५.१०.१९९४.

प्रादेशिक व्यवस्थापक,
रा.प. मुंबई / पुणे / औरंगाबाद / नागपूर / अमरावती / नाशिक.

कार्यशाळा व्यवस्थापक,
रा.प. मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी, पुणे / औरंगाबाद / नागपूर.

व्यवस्थापक (प्रशिक्षण),
रा.प. मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे/शहादा(धुळे)/चंद्रपूर/पांढरकवडा(यवतमाळ).

मुख्य सल्लागार,
संस्थांतर्गत व्यवस्थापन सल्ला गट,
रा.प. मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.

विभाग नियंत्रक,
रा.प. भांडार विभाग, कुर्ला, मुंबई / मुंबई / धुळे / जळगाव / नाशिक / पालघर / रायगड(पेण) / रत्नागिरी / सिंधुदुर्ग / ठाणे / पुणे / अहमदनगर / कोल्हापूर / सांगली / सातारा / सोलापूर / औरंगाबाद / बीड / जालना / लातूर / नांदेड / उस्मानाबाद / परभणी / नागपूर / अकोला / अमरावती / भंडारा / बुलढाणा / चंद्रपूर / वर्धा / यवतमाळ.

कार्यकारी अभियंता, रा.प. औरंगाबाद / धुळे / कोल्हापूर / नागपूर / पुणे / परभणी / कुर्ला / अकोला / बारामती.

विषय :- अनुसूचित जमातीच्या उमेदवाराचे जातीचे दाखले तपासणी बाबत...

संदर्भ :- १) या कार्यालयाचे परिपत्रक क्र. ५१/१९९०,
क्र. राप/आस्था/मागा/१०/७५१०, दि. ३१.१२.१९९०.
२) या कार्यालयाचे परिपत्रक क्र.
क्र. राप/आस्था/मागा-२/२९४८, दि. २२.६.१९९४.

...

अनुसूचित जमातीसाठी शासनाने ठरवून दिलेल्या राखीव जागेवर सक्षम निवड समितीने निवड केलेल्या अनुसूचित जमातीच्या उमेदवारांची नियुक्ती करण्यापूर्वी त्या उमेदवाराचे जातीचे प्रमाणपत्र व नोकरीसाठी केलेला अर्ज व इतर संबंधित कागदपत्रे, जातीचे प्रमाणपत्र तपासणी-या संबंधित समितीकडे पाठवावेत इ. बाबतच्या शासन निर्णय क्र. सीबीसी-१६८२/५१२/का-१०, दिनांक १८.४.१९८९ नुसार दिलेल्या सूचनांची अंमलबजावणी करण्यासाठी या अगोदरच सर्व विभागांना / घटकांना या कार्यालयाचे परिपत्रक क्र. राप/आस्था/मागा-२/२९४८, दि. २२.६.९४ अन्वये कळविण्यात आलेले आहे, तरी पण शासनाच्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यास काही विभागाकडून दिरंगाई झाल्याचे या कार्यालयाचे निदर्शनास आलेले आहे आणि म्हणून या परिपत्रकाद्वारे आपणास परत स्पष्ट सूचना देण्यात येत आहेत.....

तपासणी समितीने उमेदवाराचे जातीचे प्रमाणपत्राची तपासणी करण्यासाठी जर काही ज्यादा कागदपत्रांची मागणी केली तर संबंधित उमेदवारांनी सदरच्या कागदपत्रांची पूर्तता तपासणी समितीचे पत्र मिळाल्यानंतर त्वरीत करावयाची आहे. उमेदवाराने ज्यादा कागदपत्राची पूर्तता समितीस करुन दिल्यानंतर, तपासणी समितीने

..२..